
अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा



अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा



मराठी : अश्विनी बर्वे



जादुई काका

एकदा अल्लाउद्दिन नावाचा एक आळशी मुलगा होता.त्याचे वडील एकटे कुटुंब सांभाळायचे. ते चिंतेने मेले. त्यामुळे अल्लाउद्दिनची आई खूप दुःखी झाली.

एक दिवस अल्लाउद्दिन नेहमीसारखी काहीतरी गडबड करत होता तेव्हा एक माणूस त्याच्याजवळ आला,

“अल्लाउद्दिन“ तो म्हणाला. “मी तुझा काका अबानज़र आहे. तुझे वडील म्हणजे खूप वर्षांपूर्वी हरवलेला माझा भाऊ होता.”



त्या संध्याकाळी काकाने स्वतःच अल्लाउद्दिनच्या घरी जेवण्याचे आमंत्रण घेतले.

जेव्हा त्याला कळलं की अल्लाउद्दिन जवळ कोणतीही नोकरी नाही तेव्हा त्याने अल्लाउद्दिन साठी एक दुकान खरेदी केले.



त्यामुळे अल्लाउद्दिन आणि त्याची आई खूप खुश झाली.पण त्यांना या गोष्टीचा अंदाज नव्हता की वास्तवात अबानज़र एक दुष्ट जादुगार होता.

दुसऱ्या दिवशी, अबानज़र, अल्लाउद्दिनचे शहरातून बाहेर फिरायला गेला.



त्याला गवतात दगडांनी केलेला एक जाळीचा दरवाजा दिसला. अल्लाउद्दिन तो बघून हैराण झाला.त्याचे काका जादू करू शकत होते.

“या दगडाखाली अनेक खजाने लपलेले आहेत,पण त्यातला मला एकच हवा आहे,” अबानज़र म्हणाला, “जरा तिथून दिवा घेवून ये.”



“बघ आपण आता पोहचलो,” शेवटी काका म्हणाले, त्यांनी आग पेटवली आणि त्यावर कसली तरी पावडर फुंकली, आणि एक विचित्र असा मंत्र म्हटला.





काका म्हणाले, “ही अंगठी तुझ्याजवळ ठेव,ती तुझी रक्षा करेल,” ते अल्लाउद्दिनला खाली ढकलत म्हणाले. अल्लाउद्दिन सोन्याने भरलेल्या चार खोल्यामधून चालत एका फळांनी लगडलेल्या बागेत येवून पोहचला.तिथली फळं काचेच्या तुकड्यांसारखे चमकत होते.



अल्लाउद्दिनने दिवा शोधला आणि आपल्या खिश्यात ठेवला. मग त्याने काही सुंदर फळं उचलली.

“मला दिवा लगेच दे,” प्रवेश दारातून अबानज़र ओरडला.

अल्लाउद्दिनने दिवा शोधायला खूप वेळ घेतला होता. म्हणून अबानज़र वाटलं की अल्लाउद्दिन त्याला धोका तर देणार नाही.



अल्लाउद्दिन उत्तर देणार तेवढ्यात जोरात आवाज झाला आणि सगळीकडे अंधार पसरला.

दोन जीन



अल्लाउद्दिन आता फसला होता. तिथं थंड होतं, अंधार आणि खूप भीतीदायक वातावरण होतं. अल्लाउद्दिनने आपले हात गरम करण्यसाठी ते एकमेकांवर घासले..

अचानक, एक राक्षसारखा माणूस समोर येवून उभा राहिला.

“मी अंगठी मधला जिन आहे” तो म्हणाला, “हुकुम द्या, मी आपल्या साठी काय करू शकतो.”



“मला इथून लगेच बाहेर काढ!” अल्लाउद्दिन ओरडला.डोळ्याचे पाते न लवते तोच अल्लाउद्दिनने स्वतःला त्याच्या घराच्या बाहेर झोपलेलं पाहिलं.



तो आपल्या आईला सगळं काही सांगायला घरात पळाला.

"अबानज़र माझे काका नाहीत. त्यांनी जादूटोणा करून मला मारण्याचा प्रयत्न केला.” तो रडत म्हणाला.



“सोड ते, खोट्यानाट्या गोष्टी बनवून सांगणं बंद कर,” आई म्हणाली. “ठीक आहे, तुला काय खायचं आहे? मी काही पदार्थ विकत घेण्यासाठी तो जुना दिवा विकणार आहे.”

मग आई तो दिवा घासून चमकावू लागली.पण तेव्हाच त्यातून एक विशालकाय माणूस तरंगत बाहेर आला.



“तुमच्याजवळ काही खायला आहे का?” अल्लाउद्दिनने विचारले, “मी भुकेने मरत आहे” डोळ्याचं पातं लवत नाही तोच दोन ताटात शाही भोजन त्यांच्या समोर हजर झालं.

जेवण आणि दारू दोन आठवडे चालली. जेव्हा ते संपलं, तेव्हा अल्लाउद्दिनने चांदीची ताटं विकून टाकली.



आता अल्लाउद्दिनचे जीवन सोप्पे झाले, जेव्हा अल्लाउद्दिन किंवा त्याच्या आईला जेवण हवे असे, तेव्हा ते दिवा घासून जिन कडून जेवण मागवत असत.

एक दिवस, अल्लाउद्दिन चांदीची ताटं विकण्यासाठी बाजारात गेला. तेव्हा त्याने काही चकाकणारे दागिने बघितले.

“हे तर गुहेतल्या काचेच्या फळांसारखेच आहेत,” तो आश्चर्याने म्हणाला.



मग तो सरळ धावत धावत घरी आला. जे दागिने त्याने गुहेतून आणले होते ते त्याने लपवून ठेवले.



सुल्तानची मुलगी



एक दिवस सकाळी सकाळी सुलतानाचा आदेश आला.

"राजकुमारी बद्र-अल-बुदुर आज सार्वजनिक स्नाणासाठी जाईल. म्हणून सगळ्या नागरिकांनी आपआपल्या घरातच राहावे."

अल्लाउद्दिनला आश्चर्य वाटलं,की इतक्या छोट्या गोष्टीचे भांडवल का केले जात आहे. अल्लाउद्दिन स्नानघरात जावून लपला,म्हणजे तो राजकुमारीला पाही शकेल.



जेव्हा राजकुमारीने आपला घूंघट बाजूला केला तेव्हा अल्लाउद्दिन जवळजवळ बेशुद्धच झाला. याआधी त्याने फक्त एकाच महिलेचा चेहरा पहिला होता - आपल्या आईचा. राजकुमारी खूप-खूप सुंदर होती.

मग डोळ्यात चमक आणि चेहऱ्यावर स्मित घेवूनच अल्लाउद्दिन घरी परत आला.

“काय झालं?” आईने उत्सुकतेने विचारलं..

“मी सुलतानच्या मुलीच्या प्रेमात पडलो,” तो म्हणाला.



आई हसली, पण अल्लाउद्दिन मात्र खूप गंभीर होता.

“जर मी बद्रशी लग्न केलं नाही तर मी मरून जाईन,” तो म्हणाला.

त्याने आईला मस्का लावला की तिने सुलतानाकडे जावून त्यांच्या लग्नाचे बोलावे.

“सुलतानाला भेट देण्यासाठी हे दागिने घेवून जा,” तो म्हणाला.



"सुलतान कधीही या लग्नासाठी तयार होणार नाही!” आई रडत म्हणाली. पण आईला आपल्या मुलाची खूप काळजी वाटत होती. म्हणून तिने त्याने जे सांगितले ते केले.

सुलतान एक भव्य महालात राहत होता. पहिल्यांदा तर सुलतानाने अल्लाउद्दिनच्या आईकडे बघितलं सुद्धा नाही.पण जेव्हा ती परत परत महालात गेली. तेव्हा शेवटी सुलतान तिच्याशी बोलला.



आईने सुलतानाला सांगितले की तिचा मुलगा राजकुमारी बद्रवर खूप प्रेम करतो.

“तसं पाहिलं तर आम्ही तुमच्या योग्यतेचे नाही,” आई म्हणाली. “पण ही छोटीशी भेट आणली आहे तिचा जरूर स्वीकार करावा.”



“हो, ... बद्रला एक पती नक्कीच हवा आहे...” सुलताना म्हणाला.

“पण तुम्ही तर म्हटले होते की माझा मुलगा राजकुमारीशी लग्न करू शकतो.” सुलतानाजवळ उभा असलेला एक वाळ्कुटा माणूस म्हणाला.

ती व्यक्ती म्हणजे एक शक्तिशाली सुभेदार आणि वजीर होता. त्याने सुलतानाच्या कानात काहीतरी कुजबुज केली.मग सुलतानाने अल्लाउद्दिनच्या आईकडे बघितले. “तुमचा मुलगा माझ्या मुलीशी तीन महिन्या नंतर लग्न करू शकतो,” तो म्हणाला.



चुकीचा नवरा



दोन महिन्यानंतर अल्लाउद्दिनची आई शहरात गेली, शहरात प्रत्येकजण शाही लग्नाबद्दल बोलत होते.

"राजकुमारी, आज वज़ीरच्या मुलाबरोबर लग्न करणार आहे.” एक माणूस ओरडत सांगत होता.

वाईट बातमी सांगण्यासाठी अल्लाउद्दिनची आई घरी गेली.अल्लाउद्दिन खूप वैतागला होता, शेवटी दिव्यात लपलेल्या जिनची आठवण आली.

अल्लाउद्दिनने जिनला सांगितले की त्याने नव्या दांपत्याला जाऊन रात्री द्यावा.



अर्ध्या रात्री जिन राजकुमारी बद्रला अल्लाउद्दिनच्या घरी घेवून आला आणि त्याने वजिराच्या मुलाला अंधारात ठ्डीत रस्त्यावर सोडून दिले.



“तू माझ्याजवळ सुरक्षित आहे,” अल्लाउद्दिन हळूवार म्हणाला.

सकाळ होण्याच्या आधीच जिनने राजकुमारी बद्र आणि वजिराचा मुलाला त्याच्या खोलीत सोडलं..

“काही गडबड आहे का?” बद्रच्या आई-वडिलांनी नाश्त्याच्या वेळी विचारलं.



राजकुमारी बद्र गप्प बसली. त्या संध्याकाळी वजिराच्या मुलाने शांत झोपेसाठी प्रार्थना केली,पण अर्ध्या रात्री जिन परत आला....

रस्त्यावर अजून एक रात्र थंडीत काढल्यानंतर वजिराचा मुलगा अजून त्रास सहन करू शकला नाही.

“माफ करा सुलतान,त्याने सुलतानाला म्हटले, “तुमची मुलगी खूप सुंदर आहे पण या भयंकर स्वप्नाशी मी जास्त काळ सामना करू शकत नाही.”




"ठीक आहे, कदाचित हे लग्न व्हायलाच नको होते,” सुलतान म्हणाला आणि मग त्यांनी ते लग्न रद्द केले.

अल्लाउद्दिनचे लग्न झाले


काही काळानंतर अल्लाउद्दिनची आई सुलतानाला भेटायला परत गेली.

“तुझ्या मुलाला अजून दागिने पाठवायला सांग,” सुलतान म्हणाला.

“मला चाळीस ताटं दागिने हवे आहेत,” सुलतान म्हणाला. “ती ताटं रेशमी कपडे घातलेले ८० सेवक माझ्या महालात घेवून येतील. तेव्हाच अल्लाउद्दिन बद्रशी लग्न करू शकेल.”



जिनने या सगळ्या गोष्टीची सहजतेने तयारी केली. एका तासातच एक मोठी मिरवणूक महालाकडे निघाली.



ते सगळं बघून सुलतानाचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसला नाही.


“तुझ्या मुलाला सांग की तो लगेचच माझ्या मुलीशी लग्न करू शकतो,” सुलतान अल्लाउद्दिन च्या आईला म्हणाला.

पण लग्नाच्या आधी अल्लाउद्दिन बद्र साठी एक सुंदर घर बांधू इच्छित होता. त्याने जिनला आपल्या स्वप्नातल्या महालाचे वर्णन केले आणि जिनने रात्रीतून तसे घर बांधले..



मग अल्लाउद्दिन एकदम भारी कपडे घालून सुलतानाच्या महालात गेला. लग्नाचा दिवस संगीत आणि नृत्याने सुरु झाला.मग भोजनाची पंगत आणि आतिषबाजीने तो दिवस संपला.


त्या संध्याकाळी बद्र आपल्या नव्या घरी आली.ती खूप खुश होती. अल्लाउद्दिन एक सुंदर माणूस होता आणि त्याचा महाल सगळ्यात चांगला होता.



अबानज़र परत आला

अबानज़र जादूचा दिवा मिळवण्यासाठी अल्लाउद्दिनच्या शहरात गेला.





वाळवंटात खूप दूर अबानजरला अल्लाउद्दिनच्या चांगल्या नशिबाची बातमी पोहचली.


"तो नक्कीच जादुचा दिवा घेवून पळाला असेल," अबानज़र रागाने म्हणाला.

बद्रने आपल्या महालातून फेरीवाल्याचा आवाज ऐकला.

"मला तो बरा वाटतो आहे," बद्रने विचार केला.तिला फेरीवाल्याला देण्यासाठी एक जुना दिवा मिळाला.

दिवा घेतल्यानंतर अबानज़र एका शांत कोपऱ्यात गेला आणि त्याने दिवा घासला. “मी आपल्यासाठी काय करू शकतो,” जिनने विचारले.

“मला, महालाला आणि राजकुमारीला लगेच वाळवंटात घेवून चल,” अबानज़र म्हणाला.



दुसऱ्या दिवशी जेव्हा सुलतानाने आपल्या खिडकीतून बाहेर बघितले तेव्हा जवळजवळ बेशुद्धच पडला.

“ माझ्या मुलीचा महाल गायब झाला,” तो म्हणाला.



त्याला वाटले की अल्लाउद्दिनने त्याला धोका दिला आहे. मग सुलतानाने काही सैनिकांना अल्लाउद्दिनला अटक करायला पाठवलं.

जेव्हा अल्लाउद्दिन शिकारीहुं परत आला.त्याला एक सैनिकांची तुकडी दिसली.त्याचा महाल गायब झाला होता. तो पण सुलतानासारखाच हैरान झाला होता.

“चिंता करू नका, मी तुमच्या मुलीला शोधल्याशिवाय शांत बसणार नाही.” त्याने सुलतानाला वचन दिलं..



अल्लाउद्दिनने निराशेत आपले दोन्ही हात एकमेकांवर घासले, आणि तेव्हाच अंगठीतून एक जिन प्रकट झाला.

"ओह! मी तर तुझ्याबाबत विसरूनच गेलो होतो.” अल्लाउद्दिन म्हणाला. “कृपया मला मदत कर.”



“मी बद्रला तुमच्याकडे घेवून येवू शकत नाही,” जिन म्हणाला,” पण तुम्हांला बद्रजवळ घेवून जाऊ शकतो.”

काही वेळानंतर अल्लाउद्दिन बद्रच्या खिडकीखाली उभा होता.



"चिंता करू नको!" अल्लाउद्दिन म्हणाला. “मी एक योजना बनवली आहे. आज रात्री तू त्या दुष्टा बरोबर जेवण करायला राजी हो. मी तुला थोडंसं विष देतो ते तू त्याच्या दारूत मिसळून टाक.

अबानज़र, बद्रचे निरीक्षण करण्यात मग्न होता. त्याने दारूत विष मिसळतांना पाहिलं नाही. एक घोट प्यायला नंतर तो जमिनीवर मरून पडला.



मग अल्लाउद्दिनने महालातून आपला दिवा शोधून काढला. थोड्यावेळानंतर अल्लाउद्दिन आणि बद्र आपल्या घरी होते.



दुष्ट भाऊ



पण ते अजूनही सुरक्षित नव्हते. अबानज़रचा एक दुष्ट भाऊ होता आणि त्याला त्यांचा बदला घ्यायचा होता.

भावाने एका पवित्र महिलेचा फातिमेचे कपडे घातले. तो अल्लाउद्दिनच्या महाला बाहेर उभा राहून लोकांचे आजार बरे करण्याचे नाटक करू लागला.

फातिमाला बघून बद्र खूप उत्साहित झाली आणि तिने तिला आत बोलावले.



"किती सुंदर हॉल आहे," नकली फातिमा म्हणाली. "पण जर तुम्ही दैवी पक्षाचे अंडे लावले तर अजून सुंदर दिसेल."

रॉक एक विशाल पक्षी आहे, जो विशाल सफेद अंडं देतो. बद्रला फातिमाची सूचना पटली आणि तिने त्याबाबत अल्लाउद्दिनला विचारलं.

"ठीक आहे," अल्लाउद्दिन म्हणाला, आणि त्याने दिव्यातला जिनला बोलावलं.



‘‘त्याच्या शिवाय काहीच नाही!” जिन रडत म्हणाला. “जर तुम्हांला रॉकचे अंड हवे असेल तर तुम्हांला मला मारावं लागेल.”

“पण मला माहित आहे की हा तुमचा विचार नाही,”जिन पुढे म्हणाला. “फातिमा, वेष बदलून आली आहे.खरा तर तो अबानज़चा भाऊ आहे. त्याला तुम्हांला मारायचं आहे.”

अल्लाउद्दिन हैरान झाला.आता त्याला लवकरच काहीतरी करणं भाग होतं.



अल्लाउद्दिनने फातिमेला आपली डोकंदुखी बरी करायला सांगितली. जसा अबानज़रचा दुष्ट भाऊ अल्लाउद्दिनच्या जवळ आला.अल्लाउद्दिनने त्याला आपल्या खंजिराने मारून टाकले.



आता अल्लाउद्दिनला आणि बद्रला त्रास देणारा कोणी वाचलं नव्हतं. आता अल्लाउद्दिन आणि बद्र सुरक्षित होते.



कालांतराने अल्लाउद्दिन सुलतान झाला आणि त्याची आई आजी झाली. त्याच्याजवळ ते सर्व होते ज्याची त्याला इच्छा होती. म्हणून त्याने जादूचा दिवा आणि अंगठी एका कप्प्यात ठेवून दिले. पण कोणाला माहित अजूनही त्यात जिन असेल.

समाप्त